MHSN150014922021

| | |
|---|---|
| अर्ज दाखल दिनांक | १६/०८/२०१७ |
| अर्ज नोंद दिनांक | १८/०८/२०१७ |
| निकाल दिनांक | ०४/०८/२०२६ |
| कालावधी ०८ वर्ष ११ महिने १९ दिवस | |
| निशाणी क्रमांकः– ३२ | |

# विटा येथील सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
# तालुकाः खानापूर जिल्हाः सांगली

(पीठासीन अधिकारी दिप्ती तुकाराम जाधव)

**दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांकः– ७५/२०२१**

{जुना दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांकः१४६/२०१७}

भगवान दादासो माने
वयः ३२ वर्षे, व्यवसायः नोकरी,
राहणारःशिराळा, तालुकाः वाळवा,
जिल्हाः सांगली. ... अर्जदार.

**विरुध्द**

१. प्रविण रविंद्र माने,
वयः २९ वर्षे, व्यवसायः शेती,

२. राहुल रविंद्र माने,
वयः २४ वर्षे, व्यवसायः शेती,
राहणारः माहुली, तालुकाः खानापूर, जिल्हाः सांगली. ... जाबदार.

---

अर्जदारतर्फे विधीज्ञ :– ॲड. जे.पी कुंभार
जाबदार क्रमांक १ व २ तर्फे विधीज्ञ :– ॲड. पी.एस देशमुख

---

# न्यायनिर्णय

(दिनांक ०४/०८/२०२६ रोजी घोषीत)

१. अर्जदारने प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ११६/२०१४ मध्ये दिनांक ०२.०१.२०१७ रोजी वारसा कायदा कलम २६३ अन्वये पारित केलेल्या न्यायनिर्णयानुसार जाबदार यांना व्यवस्थापनपत्र (लेटर्स ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन) अदा करण्याबाबत झालेले आदेश रद्द होऊन मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

## अर्जातील कथने थोडक्यात खालीलप्रमाणे:-

२. कै. दादासो परसु माने हे अर्जदार यांचे वडील होते. त्यांचा दिनांक ०१.०१.२००८ रोजी मृत्यु झाला. अर्जदार हे कृषी अधिकारी असून ते नोकरीनिमित्त शिराळा येथे राहतात. कै. दादासो परसु माने यांनी करुन ठेवलेल्या मृत्युपत्राआधारे व्यवस्थापनपत्र (लेटर्स ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन) मिळणेची मागणी जाबदार क्र. १ व २ यांनी मा. न्यायालयाकडे केली होती. त्या अर्जाचा निकाल हा दिनांक ०२.०१.२०१७ रोजी झाला. त्यानंतर जाबदार हे गट क्र. ४४० व गट क्र. ११२० याची मालकी त्यांची असून ते कब्जा करणार आहेत असे बोलून दाखवत होते. त्यावेळी अर्जदार यांनी माहिती घेतली असता त्यांना समजले की, जाबदार यांनी कै. दादासो यांचे तथाकथित मृत्युपत्राआधारे व्यवस्थापनपत्र (लेटर्स ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन) मिळणेसाठी अर्ज केला होता व त्यांचा निर्णय दिनांक ०२.०१.२०१७ रोजी झाला आहे.

३. अर्जदार यांनी सदर प्रकरणातील कागदपत्रे व नकला पाहिल्यावर अर्जदार यांना असे दिसुन आले की, त्यांचे बंधू शिवाजी दादासो माने यांनी दिनांक ०६.०९.२०१४ रोजी हजर होऊन कै. दादासो यांन अन्य कायदेशीर वारस आहेत व त्यांना या कामी पक्षकार केले नाही असा स्पष्ट अर्ज केला होता. त्या अर्जामध्ये कै. दादासो परसू माने यांची पहिली पत्नी नर्मदा हिच्यापासून शिवाजी, तानाजी, रविंद्र, भगवान व विठाबाई अशी अपत्ये असून दुसरी पत्नी लक्ष्मीबाई ही असून तिची मुलगी सजाक्का हीसुध्दा हयात आहे असे कथन केले आहे. शिवाजी माने यांनी (लेटर्स ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन) च्या तथाकथित मृत्युपत्राआधारे स्थावर मिळकतींचे हक्कपत्रकी कोणतीही नोंद झाली नाही असे कथन केले होते.

४. जाबदार क्र. १ व २ यांनी कै. दादासो परसु माने यांच्या कायदेशीर वारसांना पक्षकार केले नाही व त्यांना जाहीरनामा काढणे आवश्यक होते. जाहीर समन्स काढणे ही बाब पुरेशी नव्हती तथापि दिनांक ०६.०९.२०१४ रोजी दिलेल्या अर्जावर मे. न्यायालयाने आदेश पारित करुन दिनांक ०२.०१.२०१७ रोजी किरकोळ अर्ज क्र. ११६/२०१४ यामध्ये अंतिम न्यायनिर्णय देऊन जाबदार क्र. १ व २ यांच्या नावे कै. दादासो माने यांचे दिनांक २८.०९.२००२ चे मृत्युपत्राबाबत व्यवस्थापत्र (लेटर्स ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन) योग्य ते न्यायालयीन शुल्क भरल्यानंतर देण्यात यावे असा आदेश झाला आहे. लेटर्स ऑफ

ॲडमिनिस्टेशनचा झालेला आदेश रद्द होणे आवश्यक आहे. सबब, अर्ज.

५. अर्जदारने अशी विनंती केली आहे की, दिवाणी किरकोळ अर्ज क्र.११६/२०२४ मध्ये दिनांक ०२.०१.२०१७ रोजी पारित केलेला न्यायनिर्णय रद्द करण्यात यावा.

**<u>जाबदार क्र. १ व २ यांनी निशाणी १५ वर म्हणणे दिलेले आहे.</u>**

६. त्यांनी अर्जातील कथने नाकारली आहेत. पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार यांचे वडील व आजोबा यांनी त्यांच्या एकत्र कुटूंबातील मिळकतींचे ब–याच वर्षापुर्वी सन १९६८ मध्ये तोंडी वाटप करुन त्या मिळकती अर्जदार व त्यांचे बंधू यांना दिल्या होत्या. त्याप्रमाणे मिळकतीच्या सात बारा रेकॉर्ड सदरी तशी नोंदीही झाल्या आहेत. गट नं. ११२० ही अर्जदार यांचे बंधू बाळु दादासो माने यांना वाटपाने मिळाली होती. बाळु दादासो माने हे अविवाहित मयत झाल्याने सदरची मिळकत ही दादासो परसु माने यांना मिळाली होती. गट क्र. ४४० ची जमीन ही कै. परसू काका माने यांच्या पश्चात दादासो परसू माने यांना मिळाली होती. शेत जमिनी व मिळकती या अर्जदार तसेच त्यांचे इतर बंधु यांना मिळालेल्या होत्या.

७. मृत्युपत्रात नमूद केलेल्या मिळकती हया दादासो परसू माने यांच्या वैयक्तिक मिळकती होत्या. तसेच दादासो परसू माने यांनी त्या मिळकतींचे मृत्युपत्र

करुन ठेवले होते. त्यामुळे सदर मृत्युपत्रास अर्जदार किंवा त्यांच्या भावांना हरकत घेता येणार नाही. तो आदेश रद्द करण्याची अर्जदार यांची मागणी कायदेशीर नाही. सबब, अर्जदार यांचा अर्ज रद्द करावा ही विनंती केली आहे.

८. अर्जदार भगवान दादासो माने यांनी स्वत:चे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र निशाणी १८ वर दिलेले आहे. निशाणी २८ वर पुरावा बंदची पुरसिस दिलेली आहे. जाबदार यांनी निशाणी ३१ वर पुरावा देणार नाही याबाबत पुरसिस दिलेली आहे. दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ११६/२०१४ मधील न्यायनिर्णयाची प्रत निशाणी ८ व हुकूमनाम्याची प्रत निशाणी ९ वर दखाल आहे. ती बाब वादातीत नाही.

९. अर्जदारतर्फे विधिज्ञ श्री. जे. पी कुंभार व जाबदार यांच्यामार्फत श्री. पी.एस देशमुख यांचा युक्तिवाद ऐकला.

१०. अर्जाच्या निकालासाठी खालील मुद्दे विचाराधिन आहेत. सदरचे मुद्दे आणि त्यावरील निष्कर्ष कारणमीमांसेसहीत खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार सिध्द करतात काय जाबदार यांनी मा. न्यायालयाची दिशाभूल करुन तसेच सर्व वारसांना | होकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| | अर्जामध्ये समाविष्ट न करता दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ११६/२०१४ मध्ये दिनांक ०२.०१.२०१७ रोजी वारसा कायदा कलम २६ अन्वये मयत कै. दादासो परसु माने यांच्या वादातील मृत्युपत्राच्या आधारे व्यवस्थापनपत्र (लेटर्स ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन) प्राप्त करुन घेतले आहे ? | |
| २ | अर्जदार हे सदरचा आदेश रद्दबातल होऊन मिळण्यास पात्र आहेत काय ? | होकारार्थी |
| ३ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>कारणमीमांसा</u>

**<u>मुद्दा क्रमांक १ व २ बाबतः—</u>**

११. अर्जदारने यातील जाबदार क्र. १ व २ यांच्या लाभात दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ११६/२०१४ मध्ये मयत दादासो माने यांच्या वादातील मृत्युपत्राआधारे जे व्यवस्थापनपत्र देण्याबाबत न्यायालयाचे आदेश पारित झालेले आहेत त्यास आव्हान दिलेले आहे. अर्जदार साक्षीदार भगवान माने यांनी स्वत:चे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र देऊन अर्जातील मजकूर पुन्हा शपथेवर नमूद केलेला आहे. जाबदार क्र. १ व २ मार्फत त्यांचा उलटतपास घेण्यात आला आहे. उलटतपासामध्ये ते आपल्या सरतपासातील कथनांवर ठाम आहेत. ते मयत दादासो परसू माने यांचे वारस नाहीत अशी कोणीतीही कबुली उलटतपासातून आलेली नाही. किंबहुना जाबदार यांचे तसे म्हणणे देखील नाही. केवळ मृत्युपत्राशी त्यांचा संबध नाही व त्यांना इतर मिळकती दिलेल्या आहेत तसेच मुळ

अर्ज क्र. ११६/२०१४ ची माहिती त्यांना त्यांचे भाऊ शिवाजी माने यांच्याकडून मिळाली होती. अशा स्वरुपाचा उलटतपास झालेला आहे.

१२. अर्जदार यांच्या वकीलांनी असा युक्तिवाद केला की, मयत दादासो माने यांना जाबदार क्र. १ व २ हेच एकमेव वारस नसून अन्य देखील वारस आहेत. त्याबाबत त्यांनी अर्जात कै.दादासो परसू माने यांना पहिली पत्नी नर्मदा हिच्यापासून शिवाजी, तानाजी, रविंद्र, भगवान व विठाबाई अशी अपत्ये असून दुसरी पत्नी लक्ष्मीबाई पासून मुलगी सजाक्का ही सुध्दा हयात आहे असे नमुद केलेले आहे. सर्व वारसांना अर्जात समाविष्ट करणे आवश्यक आहे.

१३. मयत दादासो माने यांचे वादातील मृत्युपत्र हे कायदेशीर आहे किंवा नाही हा भाग चौकशीअंती ठरणार आहे. परंतू मुळ अर्जामध्ये मयत दादासो यांच्या सर्व वारसांना अर्जात समाविष्ट करणे कायदयाने आवश्यक होते. जाबदार यांच्या वकीलांनी असा युक्तिवाद केला की, न्यायालयाने जाहीर नोटीस व जाहीरनामा काढून कोणीही हरकत नोंदविली नसल्याने आदेश पारित केलेले आहेत. मृत्युपत्र हे जाबदार क्र. १ व २ यांच्या लाभात झालेले होते. त्यास कोणीही आव्हान दिले नसल्याने मुळ अर्ज मंजुर झालेला आहे. झालेले आदेश न्यायोचित असल्याने ते रद्द होणेस पात्र नाहीत.

१४. जाबदार यांच्या वकीलांनी अर्जदार साक्षीदार क्र.१ यांचा उलटतपास घेतलेला आहे. परंतु तो मिळकतीबाबत व इतर बाबींबाबत असल्याचे स्पष्ट होते. तसेच मृत्युपत्राच्या अनुषंगाने देखील प्रश्न विचारले आहेत. परंतू प्रस्तुत अर्जदार यांच्या मयत दादासो माने यांच्याबरोबर कोणतेही संबंध नसून ते त्यांचे वारस नाहीत असा पुरावा जाबदार यांनी पटलावर आणलेला नाही. किंबहुना मयत दादासो यांना चार मुले शिवाजी, तानाजी, रविंद्र व भगवान हे पटलावर आलेले आहेत व ते किरकोळ अर्ज क्र. ११६/२०१४ मध्ये आवश्यक पक्षकार होते. ते मयत दादासो यांचे वारस असल्याची माहिती जाबदार क्र.१ व २ यांना प्रथमपासून आहे. तेव्हा त्यांना पक्षकार करण्यास कोणतीच अडचण नव्हती.

१५. अर्जदार यांच्या वकीलांनी असा युक्तिवाद केला की, त्या मृत्युपत्रास मयत दादासो माने यांचा दुसरा मुलगा शिवाजी माने यांनी किरकोळ अर्ज क्र. २५/२०२० दाखल करुन आव्हान दिलेले आहे. जाबदार क्र. १ व २ यांनी मयत दादासो यांच्या अर्जात सामील न करता वादातील व्यवस्थापनपत्र प्राप्त करुन घेतलेले आहे. सदरचे जाबदार यांचे कृत्य हे मा. न्यायालयाची दिशाभूल करणारे आहे. ते एकमेव कारण देखील दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ११६/२०१४ मधील आदेश रद्दबातल होणेस पात्र आहे. मयताच्या सर्व वारसांना नोटीस काढणे कायदयाने आवश्यक असताना ती न काढता एका वारसाला दिलेले व्यवस्थापनपत्र अथवा प्रोबेट हे रद्द होणेस पात्र आहे. जाबदार क्र. १ व २ यांनी जरी जाहीर नोटीस काढली हे मान्य केली तरी जाहिर नोटीस ही तमाम

लोकांसाठी असते परंतु जेव्हा पक्षकारांना/अर्जदार यांना मयताला इतर वारस आहेत याचे वैयक्तिक ज्ञान असते तेव्हा त्यांनी त्यांना पक्षकार करणे कायदयाने अभिप्रेत आहे.

१६. मृत्युपत्राआधारे एखादा वारस दाद मागत असल्यास ते मृत्युपत्र हे पुरावा कायदयानुसार शाबित होणे तसेच त्यामध्ये सर्व वारसांना पक्षकार करणे आवश्यक आहे. पटलावर आलेल्या पुराव्यानुसार मयत दादासो परसू माने यांना जाबदार क्र. १ व २ सोडून इतर देखील वारस आहेत. त्यांना मुळ अर्ज दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ११६/२०१४ मध्ये पक्षकार करणे आवश्यक होते. जरी मृत्युपत्र हे नोंदणीकृत असले तरी देखील ते शाबित करुन घेण्याची पध्दत ही कायदयामध्ये नमूद केलेली आहे.

१७. जाबदार यांनी मुळ अर्जात मयत दादासो परसू माने यांच्या सर्व वारसांना पक्षकार केलेले नव्हते. किंबहुना त्यांनी त्या अर्जामध्ये इतर वारसांचा उल्लेख देखील केलेला नाही. त्यामुळे त्यांनी न्यायालयापासून सदरची बाब लपवून ठेवली आहे असे म्हणता येईल. सबब, अर्जदारचा अर्ज मंजूर होऊन किरकोळ अर्ज क्र. ११६/२०१४ मध्ये दिनांक ०२.०१.२०१७ रोजी पारित झालेले आदेश रद्द होणेस पात्र आहेत व त्या अनुषंगाने मुळ अर्ज ११६/२०१४ हा पुन्हा पटलावर येऊन त्यामध्ये सर्व पक्षकारांना सामील करुन ते चालविणे जाबदारांवर

बंधनकारक आहे. सबब, मुद्दा क्रमांक १ व २ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवून मुद्दा क्रमांक ३ च्या उत्तरासाठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आ दे श**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. मुळ दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ११६/२०१४ मध्ये दिनांक ०२.०१.२०१७ रोजी पारित झालेले आदेश रद्द करण्यात येत आहेत. सदरचा अर्ज पुन्हा फैलावर घेऊन सर्व वारसांना नोटीसा काढून चालविण्यात यावा असे जाबदार क्र. १ व २ यांना आदेशित करण्यात येत आहे.

JADHAV DIPTI TUKARAM

Digitally signed by JADHAV DIPTI TUKARAM
Date: 2026.08.05 12:34:47 +0530

विटा. (दिप्ती तुकाराम जाधव)

दिनांकः ०४/०८/२०२६. सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, विटा

ता.खानापूर, जि.सांगली.

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | A.P.Patil (Grade II) |
| Court | : | Jt. Civil Judge Senior Division, Vita. |
| Date of Judgment | : | 04/08/2026. |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 05/08/2026. |
| Judgment/Order uploaded on | : | 05/08/2026. |